**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०७.०५.२०२६ गुरूवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :–**

मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, हिंगणा कोर्ट, जि. नागपुर श्री. व्हि. आय. शेख साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. २३५/२०२४ मधील, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथील अप. क्र. ३६९/२०२४ कलम २९४, ५०६, ५०० भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी नामे गोपाल तुकाराम ठाकरे, वय ५४ वर्षे, रा. पालकर ले–आऊट, वानाडोंगरी, एमआयडीसी., नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम २९४, ५०६, ५०० भा.दं.वि. कायद्‌यान्वये १५ महिने कारावासाची शिक्षा व ५,०००/– रू. दंड अशा कारावासाची शिक्षा ठोठावली.**

पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्‌दीत राहणाऱ्या फिर्यादी महीला ह्या पुर्वी आरोपीचे घरी घरकाम करीत होत्या. परंतु, आरोपीचे स्वभावामुळे त्यांनी घरकाम सोडले होते. दिनांक १३.०४.२०२४ रोजी, फिर्यादी महीला रस्त्याने पायदळ जात असता, आरोपीने फिर्यादी महीलेस अश्लील टोमणे मारून शिवीगाळ केली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी. येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोहवा. धनंजय सिंग यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. एस.पी. देशमुख साहेब यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. धिरज लामसोंगे साहेब यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. ओमप्रकाश थोरात यांनी काम पाहिले.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमना :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०५.२०२६ चे २२.०० वा. ते २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीची पत्नी नामे सौ. रेश्मा चंद्रशेखर पाचे, वय ४७ वर्षे रा. प्लॉट नं. ६१, प्रिती ले–आऊट, हनुमान नगर, न्यु येरखेडा, कामठी, नागपूर ह्या त्यांची ॲक्टीवा क्र. एम. एच. ४० सि. एल. ७३३२ ने सोबत मित्र नामे सुरज रमेश लक्षणे, वय ४३ वर्षे याचेसह डबलसिट पोलीस ठाणे कळमना हद्दीतील जबलपुर हायवे वरील टोल नाका चे आधी पावनगांव ब्रिज येथुन जात असता एका अज्ञात पांढऱ्या रंगाचे चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे पत्नीचे ॲक्टीवाला धडक देवुन पळुन गेला. अपघातात फियादीची पत्नी व तीचे सोबतचे मित्र असे दोघेही गंभीर जखमी झाले. फिर्यादीचे पत्नी यांना उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय, कामठी येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक ०७.०५.२०२६ रोजी डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. सोबत असलेला सुरज लक्षणे यांस उपचाराकरीता आशा हॉस्पीटल व तेथुन न्युरॉन हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले आहे, उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी चंद्रशेखर गेंदलाल पाचे, वय ५७ वर्षे, रा. अशोक नगर, पिपरी रोड, आंबेडकर चौक, कन्हान, जि. नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. निवृत्ती फड यांनी आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१), २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४, १३४, १७७ मो. वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापुर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.०५.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे आर्यन दिपक जैस्वाल, रा. प्लॉट नं. ३९ बि, किराड ले—आऊट, मानकापुर, नागपूर हे त्यांची ॲक्टीवा क्र. एम.एच. ३१ एफ.एम. २४८५ ने पोलीस ठाणे मानकापुर हद्दीतील कल्पना टॉकीज चौक, मानकापुर येथुन घरी जात असता, पल्सर मोटारसायकल क्र. एम.एच. ४० डि.एफ. २३८७ चा चालक नामे मनोहर दिवाकर कुबडे, वय २७ वर्षे, रा. उमरेड, जि. नागपुर याने त्याचे ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे भावाचे ॲक्टीवाला मागुन धडक दिली. अपघातात फियादीचा भाऊ तसेच, पल्सर चालक व त्याचे मागे बसलेला त्याचा मित्र मुकेश उईके असे तिघेही गंभीर जखमी झाले. फिर्यादीचे भावाचा उपचार सिनर्जी हॉस्पीटल येथे सुरू आहे. पल्सर चालक व त्याचा मित्र यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी पल्सर चालक नामे मनोज कुबडे यास तपासुन मृत घोषीत केले. सोबत असलेला मित्र नामे मुकेश उईके याचा उपचार सुरू आहे.

यापकरणी फिर्यादी आदीत्य राकेश जैस्वाल, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ३९ बि, किराड ले—आऊट, मानकापुर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे मपोउपनि. प्रांजली आंबेडकर यांनी पल्सर चालकाविरूध्द कलम २८१, १०६(१), १२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०२७४७/२०१० | कलम ३२४ भा.दं.वि. | सुनिल एस. बावणे, वय २९ वर्षे, रा. लालगंज, बरईपुरा, दुर्योधन बागडेचे घरी किरायाने, पाचपावली, नागपुर. | १४.०५.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**